## सराव प्रश्नपत्रिका - ३ इयत्ता दहावी विषय - भूगोल

**वेळ - दोन तास** **एकूण गुण - ४०**

---

**सूचना -**

१) सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
२) प्रश्नांची उत्तरे देताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.
३) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनाने लिहावीत.
४) शिसपेन्सिल वापरण्यास हरकत नाही. इतर रंग मात्र वापरू नयेत.

---

**प्र. १ अचूक सहसंबंध ओळखा व साखळी बनवा.** ४

| 'अ' स्तंभ | 'ब' स्तंभ | 'क' स्तंभ |
|---|---|---|
| १) गंगा नदी | i) पाउ ब्राझील | अ) झाडांची पाने गाळतात. |
| २) ॲमेझॉन नदी | ii) मुखाशी गाळाचे संचयन होते. | ब) मुखालगत बेटे आढळतात. |
| ३) ब्राझील | iii) साग वृक्ष | क) या संकेतावरून देशाचे नाव |
| ४) पानझडी वने | iv) मुखाशी गाळाचे संचयन होत नाही. | ड) मुखाशी वितरिका आढळतात. |

**प्र. २ चुकीची जोडी ओळखून लिहा.** ४

१) नद्या व उपनद्या
- i) सिंधू - सतलज
- ii) ॲमेझॉन - उरुग्वे
- iii) पॅराग्वे- पराना
- iv) गंगा - यमुना

२) पर्वतश्रेणी व शिखर
- i) काराकोरम - के२
- ii) गियाना उच्चभूमी - पिको दी नेब्लीना
- iii) महादेव डोंगर - कळसूबाई
- iv) पूर्व घाट - महेंद्रगिरी

३) राज्य व लोकसंख्या घनता

i) सावो पावलो - दाट लोकसंख्या

ii) हिमाचल प्रदेश - दाट लोकसंख्या

iii) ॲमेझोनास - विरळ लोकसंख्या

iv) पश्चिम बंगाल - दाट लोकसंख्या

४) वने व वृक्ष

i) सदाहरित वने - महोगनी

ii) पानझडी वने -साग

iii) काटेरी झुडपी वने - खेजडी

iv) समुद्रकाठची वने (खारफुटीची वने) - रबर

**प्र. ३ विधानावरून योग्य पर्याय ओळखा. (कोणतेही चार)** ४

१) मरुस्थल या नावाने प्रसिद्ध आहे.

अ) उच्चभूमी    ब) थरचे वाळवंट

क) पँटानल    ड) त्रिभुज प्रदेश

२) ब्राझीलमधील हा पर्जन्यछायेचा प्रदेश आहे.

अ) पँटानल    ब) पंपास

क) ॲमेझॉन नदीचे खोरे    ड) ब्राझील उच्चभूमीचा उत्तरेकडील भाग

३) वृक्षांची पाने रुंद व हिरवीगार असतात.

अ) सदाहरित वने    ब) पानझडी वने

क) काटेरी वने    ड) हिमालयातील वने

४) कॉफीच्या उत्पादनासाठी हा प्रदेश सुयोग्य आहे.

अ) रिओ ग्रांडे दो सुल    ब) सियारा

क) सावो पावलो    ड) ॲमेझोनास

५) भारतात नद्यांची लांबी कमी असते, पण प्रवेग जास्त असतो.

अ) पश्चिम घाटात    ब) पूर्व घाटात

क) मैदानी प्रदेशात    ड) कच्छच्या आखातात

प्र. ४ (अ) नकाशा आराखड्यात माहिती भरा. नावे द्या व सूची तयार करा.

**(कोणतेही चार)** ४

i) पश्चिम बंगाल

ii) कर्कवृत्त

iii) कारिकल

iv) दिल्ली

v) इंदिरा पॉईंट

vi) हिमाचल प्रदेश

प्र. ४ (आ) खालील नकाशाचे वाचन करा व प्रश्नांची उत्तरे लिहा.(कोणतेही चार) ४



१) ब्राझीलमधील सर्वांत मोठे नदी खोरे कोणते?

२) पराग्वे नदी कोणत्या दिशेला वाहते?

३) साओ फ्रान्सिस्को नदी कोणत्या महासागरास मिळते?

४) माराजॉ बेट कोणत्या नदीच्या मुखाजवळ आहे?

५) कोणत्याही दोन उत्तरवाहिनी नद्यांची नावे लिहा.

६) दक्षिण अटलांटिक महारागराला मिळणारी कमी लांबीची नदी कोणती?

**प्र.५ भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही दोन)** ६

१) ईशान्य भारतात लोकसंख्येचे वितरण विरळ आढळते.

२) आंतरराष्ट्रीय पर्यटक ब्राझीलकडे आकर्षित होतात.

३) क्षेत्रभेटीसाठी उपयुक्त साहित्य व प्रश्नावली बरोबर घ्यावी लागते.

४) ब्राझीलमध्ये वनस्पतींच्या सर्वाधिक प्रजाती आहेत.

प्र.६ **(अ) पुढील सांख्यिकीय माहितीच्या आधारे बहुरेषालेख काढा व पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. ६**

आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्या लाखात

| आंतरराष्ट्रीय पर्यटक संख्या लाखात | १९९५ | २००० | २००५ | २०१० | २०१५ |
|---|---|---|---|---|---|
| ब्राझील | २० | ५० | ४५ | ४० | ५० |
| भारत | २० | २१ | ३० | ५० | १४० |

१) भारतात कोणत्या वर्षी पर्यटक संख्या सर्वाधिक आहे?

२) २००० या वर्षी ब्राझीलला किती पर्यटकांनी भेट दिली?

३) कोणत्या वर्षी भारत व ब्राझीलमधील आंतरराष्ट्रीय पर्यटक संख्या सारखी आहे?

किंवा

**प्र.६ (आ) खालील आलेखाचे वाचन करा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा.** ६




i) कोणत्या देशाच्या राष्ट्रीय उत्पादनात तृतीय व्यवसायाचे योगदान अधिक आहे?

ii) भारतात कोणत्या व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे?

iii) १०% लोकसंख्या प्राथमिक व्यवसायात गुंतलेला देश कोणता?

iv) भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात तृतीय व्यवसायाचे योगदान किती टक्के आहे?

v) ब्राझीलच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कमी योगदान कोणत्या व्यवसायाचे आहे?

vi) ब्राझीलमधील द्‌वितीयक व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येची टक्केवारी किती?

**प्र.७ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** ८

१) भारतातील नागरीकरणाविषयी सविस्तर माहिती लिहा.

२) भारत व ब्राझीलचे स्थान व विस्तार या संदर्भाने तुलनात्मक माहिती लिहा.

३) हिंदी महासागर व हिमालय पर्वताचा मान्सून निर्मितीवर पडणारा प्रभाव स्पष्ट करा.

४) ब्राझीलमधील जलवाहतूकी संदर्भाने भाष्य करा.